लोकमत दि 10/09/23

धक्कादायक...

# मुलगी देण्यास नकार देणाऱ्या मामाचा भाच्यानेच काढला काटा

बहिण विधवा असल्यामुळे तिला आधार होईल या अपेक्षेने भाऊ कुटुंब कबील्यासह बहिणीच्या गावी चाभरा येथे राहण्यासाठी गेला. परंतु या ठिकाणी बहिणीच्या मुलाने मामाकडे मुलीची मागणी केली. मामाने जमीनजुमला नसल्याने नकार दिला. याचा राग मनात धरुन मागील वर्षी सप्टेंबरच्या महिन्यात अंगणात झोपलेल्या मामावर कुऱ्हाडीने वार करुन त्याचा भाच्यानेच काटा काढल्याची घटना घडली होती.

**- सुनील चौरे**, हदगाव

हदगाव तालुक्यातील बामणी फाटा या गावात मागील वर्षी सप्टेंबरच्या महिन्यात सातत्याने चोरीच्या घटना घडत होत्या. त्यामुळे पोलिस हैराण झाले होते. त्यातच ९ सप्टेंबरला चाभरा गावात एकाचा खून झाल्याची माहिती मिळाली. सपोनि विनोद चव्हाण गावात पोहचले. यावेळी ग्रामस्थांनी चोरट्यांनीच हा खून केल्याचा संशय व्यक्त केला. परंतु मयताच्या बहिणीच्या वागण्यावरुन पोलिसांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. परंतु घटनास्थळी आरोपीने कोणताही पुरावा सोडला नव्हता. विशेष म्हणजे घरातून चोरट्यानेही कोणतेही साहित्य नेले नव्हते. त्यातच मयताची बहिणी ही सारखा आरडाओरड करीत होती. त्यामुळे पोलिसांचा संशय तिच्या बळावला. पोलिसांनी साध्या वेषात तिच्यावर पाळत ठेवली. त्यावेळी तिच्या हालचाली संशयास्पद वाटत होत्या. तर दुसरीकडे मयताचा भाचाही याच्यावरही पोलिस नजर ठेवून होते. अखेर पोलिसांना गुन्ह्यात वापरलेली कुऱ्हाड सापडली. ती कुऱ्हाड धुवून ठेवण्यात आली होती. परंतु दांडा चिरलेला होता. त्या दांड्यात रक्ताचे काही अंश पोलिसांना सापडले. मयताच्या रक्ताशी ते जुळवून पाहण्यात आले.

## आईने केली पाठराखण

- मयताच्या बहिणीला आपल्याच मुलाने भावाचा खून केल्याचे माहित होते. उलट खूनानंतर तिनेच आपल्या मुलाचे रक्ताने माखलेले कपडे धुतले होते. पोलिस तपासाला गेल्यानंतरही ती त्यांच्यावरच धावून जात होती. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला.

आठवणीतला तपास

लोकमत exclusive



## भाच्याच्या त्रासाने मुलगी मामाकडे

भाच्याने मामाकडे मुलीसोबत लग्न लावून देण्याचा तगादा लावला होता. त्यामुळे त्याचा पिच्छा सोडण्यासाठी मयताने मुलीला वसमत येथील मामाकडे राहायला पाठविले होते. मात्र गौरी पुजेच्या निमित्ताने ती चाभरा येथे आली होती. त्यावेळी पुन्हा एकदा आरोपी भाच्याने मामाकडे मुलीसोबत लग्न लावून देण्यासाठी भांडण केले. परंतु मामाने तुझ्याकडे जमीन नाही, कामधंदा नाही, असे म्हणून त्याला नकार दिला होता.

## खूनानंतर फिरत होता सोबत

आरोपी भाचा हा मामाचा खून केल्यानंतरही सहजपणे वावरत होता. तो पोलिस तपास करीत असताना तो त्यांच्यासोबत फिरतही होता. परंतु पोलिसांना त्याच्यावर अगोदरच संशय होता. त्यातूनच तो जाळ्यात अडकला.